॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ...
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२६ वा | बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सत्ताधाऱ्यांशी अशोक खरातचे संबंध, त्यामुळे त्याचा एन्काउंटर करतील?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अशोक खरातचा कुठे तरी एन्काउंटर करतील. कारण त्याच्याशी अनेकांची नावे जोडली गेली आहेत, ती पुढे येण्याची शक्यता आहे. त्यात सत्ताधारी पक्षातील नेते, मंत्र्यांचीही काही नावे आहेत, त्यामुळे त्याबाबतचे पुरावे बाहेर येण्याआधी हेच लोक खरातचा एन्काउंटर करवतील, अशी शंका काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी बोलून दाखवली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर माध्यमाशी बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी अशोक खरातबाबत सरकारवर खळबळजनक आरोप केला आहे. त्या म्हणाल्या, अशोक खरात प्रकरणात सत्तेतल्या अनेक लोकांचे संबंध समोर येतील, त्यामुळे त्याचा एन्काऊंटर होऊ शकतो.

अशोक खरातच्या सोलापूर जिल्ह्यातील जमिनीबाबत खासदार शिंदे म्हणाल्या, सरकारमधील मंत्री, अधिकारी आणि अशोक खरात यांची शंभर टक्के मिलिभगत आहे. काही पुरावे बाहेर येणार आहेत, पण त्या अगोदरच त्याचा सत्ताधारी पक्षातील लोकच काहीतरी करवतील.



**तुमच्या डोक्यात महिलाविरोधी विचार**

रुपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा चाकणकर यांनी बँकेची खाती बनावट असल्याचा दावा केला आहे, त्यावर तसे पुरावे मिळाल्याचे प्रणिती शिंदे यांनी म्हटले आहे. तसेच, एकीकडे महिला आरक्षणाची चर्चा होत असताना नाशिकसारख्या शहरात महिलांचे शोषण होत असेल तर ते गंभीर आहे. महिलांच्या विरोधातील विचारच तुमच्या डोक्यात असतील तर तुम्ही आरक्षण कसे लागू करणार, असा सवालही शिंदे यांनी विचारला.

**राज ठाकरेंच्या विचारांशी सहमत**

मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या विचारांशी मी सहमत आहे. माझ्याकडे वर्गणी मागण्यासाठी येतात, तेव्हा मी सांगते की, मी वर्गणी देणार नाही, वस्तू स्वरूपात काही द्यायचं असेल तर देणार. फक्त जयंती, पुण्यतिथीनिमित्त नव्हे तर वर्षभर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जगले पाहिजेत.

**संविधान टिकविण्याची लढाई**

त्या म्हणाल्या, संविधान आणि लोकशाही संकटात आलेले आहे, त्यामुळे आज बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची गरज आहे. जात, पात धर्म बाजूला ठेवून संविधान टिकविण्याची लढाई सर्वांनी लढली पाहिजे.

**मोदी सरकारला तीस महिन्यानंतर जाग**

मोदी सरकारने उद्यापासून महिला आरक्षणावर तीन दिवसांचं संसदेचे अधिवेशन बोलावलं आहे. पण 2023 ला महिला विधेयक मंजूर करण्यात आले. त्या आधी काँग्रेसने पंचायत राज संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता तीस महिन्यानंतर महिला आरक्षण लागू करण्याबाबत मोदी सरकारला जाग आली आहे, असा टोला प्रणिती शिंदे यांनी मोदी सरकारला लगावला.

**प्रथा-परंपरा मोडण्याचे काम**

महिला आरक्षण विधेयक अगोदरच पारित झाले आहे. पण भाजपला डिलिमिटेशन, जनगणना आणायची आहे. हे किती असंविधानिक आहे. कारण डिलिमिटेशनच्या अगोदर जनगणना होणे गरजचे आहे. हे सर्व विरोधकांना विश्वासात न घेता एकतर्फी चाललं आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेची प्रथा-परंपरा मोडीत काढण्याचे काम मोदी सरकारकडून केले जात आहे, असा आरोप प्रणिती शिंदे यांनी केला.

# पुण्याहून सोलापूर आता ४० मिनिटांत पोहोचणे शक्य होणार

## १ मेपासून स्टार एअरची विमानसेवा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्याहून सोलापूरला आता अवघ्या ४० ते ४५ मिनिटांतच पोहोचणे शक्य होणार आहे. पुणे विमानतळावर सोलापूरसाठी सेवा देणाऱ्या स्टार एअर कंपनीला स्लॉट मंजूर झाले असून १ मेपासून ही विमानसेवा सुरू होणार आहे.

पुण्याहून पहिल्यांदाच सोलापूरशी हवाई कनेक्टिव्हिटी होत असून या निमित्ताने पुण्याशी जोडलेले सोलापूर हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले शहर ठरले आहे.

पुणे विमानतळाचा उन्हाळी हंगाम सुरू झाला असून १ मेपासून पुणे विमानतळाला मंजूर झालेले १५ स्लॉटचा वापर सुरू होत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या प्रादेशिक आणि राष्ट्रीय कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी वाढ होत आहे. १५ अतिरिक्त स्लॉटमुळे आता दररोजच्या एकूण स्लॉटची संख्या २२० वरून २३५ झाली आहे. नवीन स्लॉटमध्ये पुण्याहून सोलापूर, मंगळूरू व बागडोगरा या शहरांसाठी पुण्याहून पहिल्यांदाच विमानसेवा सुरू होत आहे.

**'कनेक्टिंग फ्लाइट'चा फायदा सोलापूरकरांना**

सोलापूरहून विमान पुण्यात दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी दाखल होईल. थोड्या वेळाच्या अंतराने पुण्याहून दिल्ली, लखनौ, देहरादून, बंगळूरू, कोलकाता, चेन्नई, दुबईसाठी उड्डाणे होतात. त्यामुळे याचा फायदा सोलापूरकरांना देखील होणार आहे. ते 'कनेक्टिंग फ्लाइट'द्वारे अन्य शहरांसाठी पुण्याहून सहजपणे प्रवास करू शकतील.

पुणे – सोलापूर – पुणे अशी आठवड्यातील सातही दिवस विमानसेवा असणार आहे. शनिवारी मात्र वेळेत बदल असणार आहे.

सोमवार ते शुक्रवार दरम्यान सोलापूरहून दुपारी अडीचच्या सुमारास उड्डाण होईल. पुण्यात दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी आगमन होईल.

पुण्याहून दुपारी ४ वाजता सोलापूरला उड्डाण होईल. ४ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास सोलापुरात आगमन होईल.

पुणे – सोलापूर – पुणे फ्लाइट क्रमांक (एस ५–३३१/३३२) असा असणार आहे.

शनिवारी सोलापूरहून ४ वाजून २० मिनिटांनी पुण्यात दाखल होईल, तर पुण्याहून सोलापूरसाठी ४ वाजून ४० मिनिटांनी उड्डाण होईल.

(सूचना : सोलापूरहून विमानाचे उड्डाण व सोलापुरात दाखल होण्याची वेळ अंदाजित आहे.)

**१५ स्लॉटचा या शहरांचा समावेश**

सोलापूर, मंगळूरू, बागडोगरा, वाराणसी, चेन्नई, बंगळूरू व पटना या शहरांसाठी पुण्याहून १ मेपासून उड्डाण होणार आहे. यातील सोलापूर, मंगळूरू व बागडोगरा या शहरांशी पहिल्यांदाच विमानसेवेने पुणे जोडले जात आहे.

# श्रीकांत शिंदे ॲक्शन मोडवर:
## माढा, सोलापूर शिवसेना कार्यकारिणी बरखास्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना पक्षसंघटना वाढीच्या दृष्टीने खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी मराठवाडा आणि सोलापूरचा दौरा केला. डॉ. शिंदे यांनी सोमवारी सोलापूर, माढा आणि धाराशिव लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतला.

त्यात विद्यमान पदाधिकाऱ्यांविरोधात मोठ्या प्रमाणात तक्रार आल्यानंतर खासदार शिंदे यांनी तातडीने दुसऱ्याच दिवशी माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या विद्यमान पदाधिकाऱ्यांना मोठा झटका मानला जात आहे.

शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी यांच्या सहीने काढण्यात आलेल्या पत्रात सोलापूर आणि माढा शिवसेना बरखास्तीचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्याबाबत पश्चिम महाराष्ट्राचे संपर्कप्रमुख दगडू सपकाळ, सहसंपर्कप्रमुख हनुमंत जगदाळे, सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख खासदार धैर्यशील माने, माढा लोकसभा संपर्कप्रमुख चंद्रहार पाटील यांनाही याबाबतची माहिती कळविण्यात आली आहे.

पत्रात म्हटले आहे की, शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि अंगीकृत संघटना (जिल्हाप्रमुख ते शाखाप्रमुख) कार्यकरणी बरखास्त करण्यात येत आहे.

लवकरच सर्व विभागीय संपर्कप्रमुख, सहसंपर्कप्रमुख आणि लोकसभा संपर्कप्रमुखांच्या उपस्थितीत मुलाखती घेऊन शाखाप्रमुख ते जिल्हाप्रमुख शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि अंगीकृत संघटना पदाधिकारी नेमणुका हे संपर्कप्रमुखाचा अहवाल आल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने करण्यात येतील.

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत सर्व शिवसैनिकांनी जोमाने काम करायचे आहे. तसेच या मोहिमेत चांगली कामगिरी करणाऱ्या शिवसैनिकांची नोंद पक्षाकडून घेतली जाईल. त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना पद दिले जाईल, असेही सांगण्यात आले आहे.

सोलापूर दौऱ्यात माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विद्यमान पदाधिकाऱ्यांमधील मतभेद चव्हाट्यावर आले होते. थेट शहाजीबापू पाटील यांच्यापासून जिल्हाप्रमुख महेश चिवटे आणि अमोल शिंदे यांच्यापर्यंत त्यांच्याच समोर पदाधिकाऱ्यांनी तक्रारी केल्या होत्या. खासदार शिंदे यांनी त्या शांतपणे ऐकून घेत दुसऱ्याच दिवशी ॲक्शन मोडवर येत दोन्ही मतदारसंघातील शिवसेनेच्या सर्वच आघाड्यांची कार्यकारिणी बरखास्त केली आहे.

**श्रीकांत शिंदेंसमोर काय तक्रारी झाल्या होत्या?**

करमाळ्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्याविरोधात आरोप करत चुकीच्या पद्धतीने निवडी झाल्याचे सांगितले. एका पदाधिकाऱ्यांने तर चिवटे यांचे नाव घेत 'तुम्ही पद घ्या, घरी बसा, काम करू नका' असे सांगत जिल्हाप्रमुखपदासाठी आपणही इच्छुक असल्याचे स्पष्ट केले होते.

सांगोल्याच्या शहरप्रमुखाने तर थेट शहाजीबापू पाटलांवर हल्ला चढवताना एबी फार्म माज्याकडे दिले. मात्र, मी सांगेन त्याला एबी फार्म द्यायचा, असे फर्मान शहाजीबापूंनी फोन करून काढल्याचे त्यांनी सांगितले. माझे पद प्रत्येक आठवड्याला बदलते, त्यामुळे मी कोणत्या पदावर काम करते, हे मलाच कळत नाही, अशी खंत पद्मजा इंगोले यांनी मांडली होती.

मी सोलापूर शहराचा रहिवासी, पण मला करमाळा, माळशिरसची जबाबदारी देण्यात आली आहे. मी कसं काम करायचं. मी शहरप्रमुखपदाची जबाबदारी मागतोय, पण मिळत नाही, अशी खंत नगरसेवक प्रियदर्शन साठे यांनी बोलून दाखवली. या सर्वांवर माढ्याचे संजय कोकाटे यांनी पक्षात उदंड पदाधिकारी झाल्याचे सांगत आता काहींना सत्तेच्या विश्रांतीची गरज असल्याचे स्पष्ट केले होते.

# सोलापूरात मध्यरात्री अभूतपूर्व उत्साहात महामानवास अभिवादन

## 'जय भीम'च्या घोषणांनी दणाणून गेला!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पार्क चौकात मध्यरात्री बारा वाजताच भीमसैनिकांचा उत्स्फूर्त जनसागर उसळला आणि परिसर "जय भीम"च्या घोषणांनी अक्षरशः दणाणून गेला.

निळ्या झेंड्यांच्या साक्षीने संपूर्ण चौक भीममय झाला होता. पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत हजारो नागरिकांनी कृतज्ञतेने अभिवादन केले; त्या क्षणी वातावरणात अभिमान, आदर आणि भावनांचा संगम अनुभवायला मिळत होता. चौकात उभारलेल्या पुस्तकांच्या स्टॉल्स, बाबासाहेबांच्या प्रतिमा, झेंडे आणि विविध साहित्यामुळे विचारांचा जणू जिवंत उत्सव रंगला. तरुणाईबरोबरच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचाही मोठा सहभाग दिसून आला.

मध्यरात्रीचे साडेअकरा वाजले होते, पार्क चौकात भीमसैनिक कुटुंबासह जमा होत होते. पाहता पाहता चौकात हजारो भीमसैनिकांची गर्दी जमली होती. निमित्त होते राज्यघटनेच्या शिल्पकाराची १३५ वी जयंती. रात्री १२ वाजताच सर्वांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.



त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर, निळ्या गुलालाची उधळण, 'जय भीम'चा जयघोष असा अभूतपूर्व उत्साह तेथे पाहायला मिळाला. रंगीबेरंगी फटाक्यांनी आकाश उजळून निघाले होते. अनेकांनी आपल्या मोबाईलमध्ये फटाक्यांच्या आतषबाजीचे व्हिडिओ शूटिंग केले.

अभिवादनासाठी राजाभाऊ सरवदे यांच्यासह ॲड. संजीव सदाफुले, सुशील सरवदे, बापू कांबळे, खंडू साबळे, अरुण भालेराव, आनंद चंदनशिवे तसेच रॉकी बंगाळे आदी उपस्थित होते. पार्क चौकात पोलिसांचा तगडा बंदोबस्त देखील होता. पोलिस उपायुक्त विजय कबाडे, डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर, मच्छिंद्र पंडित, सदर बझार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, सुशांत वरळे, सहायक पोलिस निरीक्षक सागर काटे आदी उपस्थित होते.

# ज्या दिवशी डोक्यावरून पाणी जाईल; त्या दिवशी भगीरथ भालकेंचं सगळंच काढेन - पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना प्रवेशाच्या कार्यक्रमात तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली होती. त्याला पालकमंत्री गोरे यांनी उत्तर देताना काही गर्भित इशारे दिले आहेत.

ते मला भेटून काय विनंती करत होते, त्यांचा शिवसेना प्रवेश का झाला, हे मी सांगू शकतो. पण, ती आज वेळ नाही. मात्र ज्या दिवशी डोक्यावरून जाईल, त्या दिवशी सगळं सांगेन, असा इशारा गोरे यांनी भगीरथ भालके यांना दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विविध विषयावर भाष्य केले. त्या वेळी त्यांनी भगीरथ भालके यांच्यावर टोलेबाजी केली.

ते म्हणाले, भगीरथ भालके हे भारतनानांचा वारसा सांगतात, पण भगीरथ भालके हे कदाचित भारतनाना आणि जयकुमार गोरे यांचे संबंध विसरले आहेत. भारतनाना यांना जेव्हा पाण्याचा प्रश्न सोडवायचा होता, तेव्हा ते दोन महिने मुंबईत थांबले होते, त्यावेळी राज्यपाल, मुख्यमंत्री या सर्वांच्या भेटीवेळी याच जयकुमार गोरेने मदत केली होती.

कोणी अरे तुरे बोलावे किंवा काय करावे, हे ज्याची त्याची संस्कृती असते. मला वाटतं भगीरथ भालके यांनी त्यांची संस्कृती दाखवली आहे.



दिवंगत भारतनाना यांना हे बिलकुल अपेक्षित नाही. पंढरपूरवासियांना देखील हे अपेक्षित नाहीए, असेही गोरे यांनी स्पष्ट केले.

जयकुमार गोरे म्हणाले, भगीरथ भालके काय म्हणतात, त्याला बिलकुल महत्व नाही. निवडणुकीमध्ये एकमेकांवर टीका केली जाते. माझ्या निधीची त्यांना बिलकुल आवश्यकता राहिली नाही. निधी देणारी खूप मोठी माणसं आता त्यांना मिळाली आहेत. त्यामुळे त्यांना खूप मोठ्या शुभेच्छा आहे.

भगीरथ भालके हे किती वेळा मला येऊन भेटले, माज्या पाठीमागे कशासाठी लागले होते, ते वेळ आल्यावर मीदेखील सांगू शकतो. राजकारणामध्ये काही गोष्टी असतात, ज्या सार्वजनिक करायच्या नसतात. ते कुठे भेटून मला काय विनंती करत होते, हे सगळं मलाही सांगता येईल. पण मी हे कधीही सांगणार नाही, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

शिवसेनेमध्ये भालके यांचा प्रवेश का झाला, हे देखील मी सांगू शकतो. पण आज ती वेळ नाही, राजकारणामध्ये आचारसंहिता पाळणारा मी कार्यकर्ता आहे. मी आचारसंहिता जरुर पाळीन. पण, ज्या दिवशी माज्या डोक्यावरून जाईल, त्या दिवशी मी सगळंच सांगेन, असा इशारा भालकेंनी दिला.

**पक्षवाढीचा सगळ्यांना अधिकार : गोरे**

शिवसेना प्रवेशाबाबत पालकमंत्री गोरे म्हणाले, पक्षवाढीचा सगळ्यांना अधिकार आहे. जर त्यांनी पक्ष वाढवला तर तो विचार वाढवला. आम्ही वाढवला, तर आम्ही वॉशिंग मशीन अशा पद्धतीच्या चर्चा होतात. पक्ष वाढविण्याचा जसा त्यांना अधिकार आहे, तसा आम्हालाही आहे. आगामी काळात बऱ्याच घडामोडी घडणार आहेत. जनतेने आमच्यावर विश्वास टाकला आहे, त्या विश्वासाला सार्थ ठरवून काम करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. त्यामुळे कोणाच्या प्रवेशावर उत्तर किंवा कोणाच्या टीकेला उत्तर देण्यापेक्षा हे जास्त महत्त्वाचे आहे.

# सोलापूरचा पारा ४३ अंशांच्या पार; सूर्य ओकू लागला आग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासह जिल्ह्यात उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून, आज मंगळवारी (१४ एप्रिल २०२६) तापमानाने उच्चांक गाठला आहे. आजचे कमाल तापमान ४३.२℃ से. इतके नोंदवले गेले असून, वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोरड्या हवेमुळे (आर्द्रता २५%) अंगाची लाहीलाही होत असून, दुपारच्या वेळी रस्ते ओस पडू लागले आहेत.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका वाढला असून प्रशासनाने नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**

उन्हाचा तडाखा आणि वाढते तापमान लक्षात घेता आरोग्य विभागाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत:

- पाण्याचे भरपूर सेवन करा: तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३ ते ४ लिटर पाणी प्या. लिंबू सरबत, ताक, लस्सी किंवा शहाळ्याचे पाणी घेतल्यास शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकून राहते.
- दुपारची वेळ टाळा: सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नका. बाहेर जाताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा.
- पोशाखावर लक्ष द्या: हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे वापरा. गडद रंगाचे आणि सिंथेटिक कपडे उष्णता शोषून घेतात, त्यामुळे ते टाळावेत.
- उष्माघाताची लक्षणे ओळखा: चक्कर येणे, मळमळणे, डोकेदुखी किंवा जास्त घाम येणे ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. असे वाटल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्या आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- खाद्यपदार्थ: उन्हाळ्यात पचायला हलके अन्न घ्या. जास्त तेलकट, तिखट आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा. ताज्या फळांचा आहारात समावेश करा.

**विशेष टीप-** लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि गरोदर महिलांनी उष्णतेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. मुक्या प्राण्यांसाठी आणि पक्ष्यांसाठी गॅलरीत किंवा अंगणात पाण्याची सोय नक्की करा.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

**वात्रटिका**

**बुवा आणि युवा**

कुठे बुवा तर कुठे युवा
बेलगाम नि सुसाट झाला...
रोज नवे नवे कारनामे जणू
महाराष्ट्र लिंगपिसाट झाला...
पाठ थोपटावी यांची तर
पाठीवर यांच्या वशिंड आहे...
उतावीळ असे हे की यांच्या
गुडघ्याला बाशिंग आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

संपादकीय

# युद्धाचा भुर्दंड कोणी, किती भरावा ?

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेलवाहू जहाजांची वाहतूक अडवली गेल्यानंतरच्या अवघ्या काही आठवड्यांत अमेरिका- इस्रायल यांच्या इराण युद्धाचे खरे स्वरूप उघड झाले. हा केवळ एका टापूपुरता मर्यादित तंटा नाही- कारण अख्खे जग त्याची किंमत मोजते आहे, हे सर्व संबंधितांना उमगले. ही किंमत किंवा हा भुर्दंड नेमका किती, याची मोजणी आताच करणे अशक्य आहे- ते नंतर होईलच, पण या मजकुराचा तो उद्देश नाही. हा भुर्दंड फक्त युद्धमान देशांनाच मोजावा लागणार नाही, तर त्याचा भार जगातल्या इतर देशांवरही पडेल हे एव्हाना सर्वांनाच माहीत आहे, त्यामुळे तेच सिद्ध करण्याचा हेतू या मजकुरामागे अर्थातच नाही. युद्ध- भुर्दंडाच्या दुष्टचक्राबद्दल अर्थशास्त्रज्ञांनी कधीपासून इशारे दिले, त्याचा काहीच परिणाम कसा झाला नाही आणि काय केल्याने हे दुष्टचक्र थांबेल, याचा धावता आढावा घेणे, हे या लेखाचे प्रयोजन. युद्धांची तरफदारी करण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा, सीमांना असलेल्या धोक्याचे निवारण, मानवजातीचे हित (उदा.- 'इराणकडे अण्वस्त्रे नकोत'), किंवा सांस्कृतिक संघर्ष आदी मुद्द्यांचा आधार घेतला जातो. पण या तथाकथित तार्किक आधारांपायी इतिहासात आजवर दुर्लक्षित राहिलेले सत्य म्हणजे- युद्धाची खरी किंमत कुणीही कधी मोजत नाही.

युद्ध सुरू करणारे कधीही त्याची पूर्ण किंमत मोजत नाहीत. ही किंमत युद्धखोर अथवा युद्धमान देशाला भोगाव्या लागणाऱ्या नुकसानापेक्षा नेहमीच अधिक असते; किंबहुना युद्धाची किंमत एखाददोन देशांपुरती कधीच न राहता सीमा ओलांडते, फक्त भांडवली बाजाराला फटका न देता अर्थव्यवस्थांवर परिणाम करते आणि तो परिणाम बऱ्याच काळापर्यंत जाणवणारा असतो. युद्धात होणारे नुकसान फक्त उद्ध्वस्तीकरणापुरते- पाडलेली विमाने, जमीनदोस्त इमारती यांसारखे भौतिक नसून त्याचे नकारात्मक दुष्परिणाम आणखी सखोल पाझरणारे असतात. युद्धाची सामाजिक किंमत नेहमीच अपरिमित, प्रचंड असते आणि युद्धखोरांना भोगावे लागणारे या प्रकारचे नुकसान अगदी किंचित म्हणता येईल इतकेच असते.

राजकीय अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी गेल्या किमान ३०० वर्षांपासून हे सांगितलेले आहे. ॲडम स्मिथच्या हयातीतच (१७२३- ९०) युरोपभर 'सात वर्षांचे युद्ध' (सेव्हन इयर्स वॉर- १७५६-६३) झाले, तर या युद्धाचे बऱ्याच काळापर्यंत टिकलेले दुष्परिणाम डेव्हिड रिकार्डोने (१७७२-१८२३) पाहिले. पण युद्धाच्या किमतीबाबतचा-तिच्या सार्वत्रिकतेबाबतचा- त्यांचा ऊहापोह साधार नसून अंतःस्फूर्त संकल्पनावजा होता, असे म्हणता येईल.

पुढे जॉन मेनार्ड केन्स हे तर पहिल्या महायुद्धानंतरच्या पॅरिस वाटाघाटी आणि व्हर्सायचा तह या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होते, त्यांनी त्याआधारे 'द इकॉनॉमिक कॉन्सिक्वेन्सेस ऑफ पीस' हा दीर्घनिबंध (१९१९) लिहून, जर्मनीवर जबर किंमत लादल्याने सूडभावना प्रबळ होऊन पुन्हा युद्धस्थिती येऊ शकते, असा इशारा दिला होता. त्यानंतरचे 'सामाजिक अर्थशास्त्रज्ञ' म्हणून ओळखले जाणारे कार्ल पोलान्यी यांनी 'सामाजिक नुकसाना'ची संकल्पना मांडली होती. पण या साऱ्या पूर्वसुरींनी त्या त्या वेळी युद्धाच्या आर्थिक परिणामांच्या आवाक्याबद्दल जी काही मते व्यक्त केली, त्यापेक्षा मोठा आवाका आजच्या जागतिकीकरणानंतरच्या काळात तर गृहीतच धरावा लागतो, कारण परस्परावलंबित्व हा आजच्या अर्थकारणाचा संरचनेचाच भाग आहे.

अशा संरचनेमुळेच इराण युद्धाचा भुर्दंड अपरिमित ठरतो. एकट्या अमेरिकेपुरते पाहिले तर, काही जीव गमावण्याखेरीज कोट्यवधी डॉलरचा चुराडा झालेलाच आहे. 'दर आठवड्यास अमेरिकेला १२.७ बिलियन डॉलर युद्धात खर्च करावे लागतात' असा अंदाज प्रकाशित झालेला आहे. पण या युद्धाचा व्यापक आर्थिक भुर्दंड- विशेषतः इंधन/ऊर्जा, अन्न आणि वित्तबाजार यांना बसलेला फटका प्रचंड आहे. इंधनकिमती वाढल्याचा परिणाम अख्ख्या अर्थव्यवस्थेवर होतोच- वाढीव वाहतूक खर्च तसेच वीज महाग झाल्यामुळे, खतकिमती वाढून अन्नघटकांचा उत्पादन खर्च वाढल्यामुळे तो होणारच असतो. मध्यवर्ती बँकादेखील अशा वेळी मौद्रिक धोरणे आणि व्याजदर यांत कोणतीही जोखीम घेत नसल्याने वाढ मंदावते. या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अनेक देशांचा आर्थिक वाढदर यंदा कमी राहील, असा नुकताच दिलेला इशारा गंभीर ठरतो.

त्याहून गंभीर आणि विचित्र वास्तव म्हणजे, हा सार्वत्रिक परिणाम एकत्रितपणे 'युद्धाचा भुर्दंड' म्हणून मोजलाच गेला तरीही त्यावर पुढे काहीच धोरणात्मक उपाययोजना होत नाही! युद्धभूमीवरील नुकसानापेक्षा युद्धाचा हा भुर्दंड कैकपटींनी अधिक असतो, हे सिद्ध होऊनसुद्धा त्याकडे अवघ्या मानवजातीने आणि महत्त्वाचे म्हणजे हा अप्रत्यक्ष भुर्दंड सोसणाऱ्या देशांनी, या देशांचा समावेश असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी 'भुर्दंड यांनी का सोसावा' या मुद्द्याची निर्णायक तड लावलेली नाही! वास्तविक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या दोघांनाही असे आढळून आले आहे की, हिंसक संघर्षाची आर्थिक झळ त्यापासून दूर असलेल्या अर्थव्यवस्थांना बसते- तरीही धोरणात्मक उपायावर विचार झालेला नाही.

बरे, अशा अप्रत्यक्ष नुकसानाची नेमकी मोजणी झाल्याचेही उदाहरण आहे. नोबेल-मानकरी अर्थशास्त्रज्ञ जोसेफ स्टिगलिट्झ यांनी लिन्डा बिल्मेस यांच्या सहकार्याने इराक युद्धाचे (२००३-२०११) आर्थिक, वित्तीय नुकसान आणि समष्टी-अर्थशास्त्रावर झालेले दुष्परिणाम यांची कसून मोजणी केली. त्यावर पुढे चर्चा झाली नाही, म्हणून तर आजही अमेरिका किंवा युक्रेनवर चढाई करणारा रशिया यांसारखे देश इराण वा युक्रेन युद्धाची झळ कमीच सोसणार, हे उघड आहे. युरोपीय मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्ष ख्रिस्टीन लगार्द यांनी अलीकडेच याविरुद्ध इशारा दिला. हा भुर्दंड प्रत्यक्षात इंधन आयात करणाऱ्यांना, उभरते बाजार म्हणून उभे राहू पाहाणाऱ्या देशांना आणि अंतिमतः जगभरच्या घराघरांना सोसावा लागतो, असे त्या म्हणाल्या. बाजार-अर्थशास्त्राचीच भलामण करणाऱ्यांचा नावडता 'सबसिडी' (अर्थसाहाय्य) हा शब्दच वापरायचा तर, 'अन्य देशांच्या अर्थसाहाय्यावर काही देशांची युद्धखोरी चालते'.

युद्धखोरीसंदर्भात 'अर्थसाहाय्य' ही संकल्पना फारच मानीव आहे असे कुणी म्हणेल; ते काही अंशी मान्य केले तरी झळ मात्र प्रत्यक्ष असते. संकल्पनात्मक पातळीवरचे विश्लेषण पुढे नेऊन असेही म्हणता येते की, तीन प्रकारच्या यंत्रणा या अप्रत्यक्ष अर्थसाहाय्यासाठी कार्यरत असतात. पहिली यंत्रणा भौगोलिक. जेव्हा युद्धामुळे एका केंद्रामध्ये (विशेषतः ऊर्जेच्या महत्त्वाच्या ठिकाणी) व्यत्यय येतो, तेव्हा त्याचे परिणाम दूरवर पसरतात. होर्मुझची सामुद्रधुनी हे त्याचे ताजे उदाहरण. दुसरी यंत्रणा कालिक. युद्ध ही अखेर, भविष्याकडून वर्तमानाने केलेली उसनवारी असते.

अगदी आर्थिकदृष्टयाही, युद्धासाठी सरकारे कर्ज उभारून पैसा उभा करतात आणि त्याचा भार अशा पिढ्यांवर ढकलतात, त्यामुळे भूतकाळातील युद्धांचे आर्थिक परिणाम अनेक दशकांनंतरही जाणवत राहातात. तिसरी यंत्रणा अधिकारांच्या केंद्रीकरणाशी संबंधित. काही मोजक्या जणांनी घेतलेला निर्णय इतरांच्या बोकांडी बसतो आणि नुकसान त्या बाकीच्यांचे होते. याविषयी अनेक आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी अभ्यास केलेले आहेत. त्यातून 'संघर्षांचे अर्थशास्त्र' ही अभ्यास शाखाच तयार झाली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातले या शाखेचे तज्ज्ञ पॉल कोलिअर यांनी तर. "युद्धे लोकांच्या भल्यासाठी नव्हे, तर मोजक्या उच्चपदस्थांच्या वैयक्तिक लाभासाठी लढली जातात, युद्धाचे जे काही फायदे असतील ते मर्यादित गटापर्यंतच राहून इतरांना भुर्दंडच सोसावा लागतो" असे प्रतिपादन केलेले आहे.

'चोकपॉइंट्स : अमेरिकन पॉवर इन द एज ऑफ इकॉनॉमिक वॉरफेअर' हे 'सेंटर फॉर ग्लोबल एनर्जी पॉलिसी'तील तज्ज्ञ एडवर्ड फिशरमन यांचे पुस्तक. त्यात त्यांनी, इंधनपुरवठ्याचे मार्ग आणि त्यात येणाऱ्या बाधा यांचा ऊहापोह करून, युद्ध जरी नुकसानकारक वाटले तरी हे नुकसान इतरांचेच अधिक होत असते असा निष्कर्ष काढला आहे.

पण मुद्दा युद्धाचा भुर्दंड मोजण्याचा आहे, तो न मोजल्यामुळेच युद्ध 'स्वस्त' ठरते. हेच प्रदूषणाबद्दलही आपण पाहतो. इतरांच्या जिवाला धोका असूनसुद्धा जर प्रदूषणविरोधी यंत्रणा सजग नसतील, तर मग प्रदूषक कारखाना उभारणेच स्वस्त पडणार! हेच युद्धांबद्दल खरे ठरत असते.

'प्रदूषण जे करतात, त्यांनीच किंमत मोजावी' हा आग्रह आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर धरला जातो. मग युद्धांबाबतही तसे का होऊ नये? जे संघर्ष सुरू करतात, त्यांनी त्याच्या खऱ्या खर्चाचा मोठा वाटा (त्याहून उत्तम म्हणजे, संपूर्ण खर्च) उचलला पाहिजे. हा दंडक मान्य करून तो अमलात आणण्यासाठी खमक्या जागतिक संस्थेची आवश्यकता आहे. अशी आंतरराष्ट्रीय संस्थाच, जागतिक बाजारपेठांपेक्षा अधिक प्रभावीपणे संघर्षाच्या खासगी आणि सामाजिक खर्चामध्ये ताळमेळ घालू शकेल. जोपर्यंत जग अशी संस्था निर्माण करत नाही, तोपर्यंत 'युद्धाशी संबंधित नसलेलेच अप्रत्यक्षपणे अर्थसाहाय्य' करत राहातील आणि काही जणांसाठी- काही देशांसाठी 'युद्ध करणे स्वस्तच' राहील!

# जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज !

गेल्या ४० दिवसांपासून सुरू असलेला पश्चिम आशियातील संघर्षाला अल्प का होईना पण विराम लागल्याने संपूर्ण जगाने सुटकेचा निःश्वास सोडला आहे. ४० दिवसांपूर्वी अमेरिकेचे विक्षिप्त राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्राएलला सोबत घेऊन इराणवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा मृत्यू झाला. जेव्हा अमेरिकेने इराणवर हल्ला केला आणि त्या हल्ल्यात खामेनी यांचा मृत्यू झाला तेव्हा हे युद्ध फार फार तर दोन चार दिवस चालेल. त्यानंतर इराण अमेरिकेला शरण येईल आणि युद्ध संपुष्टात येईल जगाला वाटले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाही तसेच वाटले होते. अमेरिका आणि इराण यांच्या सामर्थ्याची तुलनाच होऊ शकत नाही शिवाय अमेरिकेसोबत इस्राएल ही होता त्यामुळे इराणचा पराभव नक्की आहे अशाच भ्रमात सगळे राहिले ट्रम्प ही त्याच भ्रमात राहिले आणि तिथेच घात झाला. इराण अमेरिकेला शरण जाणे तर लांबच उलट इराणने अमेरिकेचा कडवा प्रतीकार केला. तो प्रतिकार इतका कडवा होता की अखेर अमेरिकेलाच या युद्धातून माघार घ्यावी लागली. हे युद्ध छेडून अमेरिकेने काही मिळवले नाही उलट स्वतःची नाचक्की करून घेतली. या युद्धात अमेरिकेची जितकी नाचक्की झाली तितकी याआधी कधी झाली नसेल. छोट्या राष्ट्रांवर विशेषतः तेल संपन्न राष्ट्रांवर अरेरावी करुन त्यांच्या कडील तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळवणे आणि त्याद्वारे जगावर हुकूमत गाजवणे आणि मीच जगात सर्वात शक्तिशाली असून मी सांगेल तेच इतरांनी केले पाहिजे या हुकूमशाही प्रवृत्तीने ट्रम्प यांनी इराणशी युद्ध छेडले. ज्या तेलासाठ्यांसाठी अमेरिकेने इराणसोबत युद्ध पुकारले ते तेलासाठे तर अमेरिकेला मिळालेच नाही उलट हे युद्ध छेडून अमेरिकेने स्वतःसह जगाला संकटाच्या खाईत लोटले. या युद्धाने संपूर्ण जगाचे नुकसान झाले. या युद्धात इराणचेही न भूतो असे नुकसान झाले. इराणच्या शेजारी असणाऱ्या अरब राष्ट्रात अमेरिकेचे लष्करी तळ असल्याने इराणने त्या देशावर हल्ले केले त्यामुळे त्या देशांचेही खूप नुकसान झाले. इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने तेथून होणारी तेल वाहतूक थांबली त्यामुळे तेल बाजार हादरले. इंधन दर वाढले. त्याचा परिणाम भारतासह संपूर्ण जगाला बसला. अनेक देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. महागाई वाढली त्यामुळे सर्वसामान्यांचे जिने मुश्किल झाले. या युद्धाची झळ सर्वसामान्यांच्या स्वयंपाक घराला बसली. या युद्धाने सर्वाधिक नुकसान झाले ते सर्वसामान्य नागरिकांचे. काहीही चूक नसताना सर्वसामान्य नागरिकांना या युद्धाची झळ सोसावी लागली. आता १४ दिवसांच्या युद्ध विरामाला दोन्ही देशांनी होकार दिल्याने सर्वसामान्य नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. आता किमान पुढील १४ दिवस तरी दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले होणार नाही. या १४ दिवसात दोन्ही देशात चर्चेच्या फेऱ्या घडतील. चर्चेसाठी आणि युद्धाला पूर्ण विराम देण्यासाठी इराणने अमेरिकेसमोर १० प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. या १० मागण्या अमेरिकेने मान्य केल्या तरच पूर्ण युद्ध बंदी होईल असे इराणने ठणकावून सांगितले आहे. अर्थात चर्चेला बसल्यावर यातून तोडगा निघू शकतो. तसा तो निघावा आणि या युद्धाला कायमचा विराम लागावा अशीच अपेक्षा सर्वसामान्य नागरिक करत आहेत. या युद्धातून एक गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली की युद्ध हे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही. युद्धाने कोणतेही प्रश्न सुटत नाही उलट वाढतात. युद्धाने कोणाचाही फायदा होत नाही होते ते नुकसानच. युद्धाचा शेवट हा विनाशानेच होतो. युद्धात कोणीही जिंकत नाही कोणीही हरत नाही हरते ती मानवता म्हणूनच जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी नुकतीच अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. जिल्हाधिकारी पदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी स्वामी चरणी लीन होऊन आशीर्वाद घेतले आणि देवस्थान समितीच्या सेवाकार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

**यथोचित सत्कार आणि निमंत्रण**

याप्रसंगी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या



वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद आणि प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी महेश इंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवास आणि ऐतिहासिक पारंपारिक पालखी सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.

**प्रशासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती**

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी देवस्थान समितीची भक्ती, सेवा आणि विविध उपक्रम पाहून आपण धन्य झाल्याचे मनोगत व्यक्त केले.

# राजधानीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आज राजधानीत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला विशेष आयुक्त श्वेता सिंघल यांनी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर, नवीन महाराष्ट्र सदनातील प्रांगणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला त्यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी माजी खासदार अमर साबळे, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त



स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे आणि सहायक लेखाधिकारी निलेश केदारे यांच्यासह महाराष्ट्र सदनातील अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही महामानवाच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी महाराष्ट्र सदनचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक जीवनकायार्चा आणि त्यांनी दिलेल्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाचा सर्वांना परिचय करून दिला.

# चित्रकार ऋत्विज चव्हाण यांचे ‘नेचर अनवाइंडिंग’ चित्र प्रदर्शन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सध्या सोशल मीडियाची ताकद वाढत असताना, त्याचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण प्रदर्शन करण्यासाठी चित्रकार ऋत्विज चव्हाण यांचे निवडक चित्रांचे सोशल मीडियावर प्रदर्शन भरवण्यात आले आहे. हे प्रदर्शन व्हाट्सअप, फेसबुक आणि इंस्टाग्राम वर पाहता येईल, अशी सोय केली गेली आहे. या प्रदर्शनाला "नेचर अन वाइंडिंग" असे संबोधले गेले आहे. आजच्या युगामध्ये सर्वजण स्मार्टफोन वापरत आहेत आणि त्याचाच उपयोग करून हे चित्र प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे अमूर्त शैलीचे लँडस्केप पेंटिंग आणि काही निवडक अमूर्त शैलीची चित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. डिजिटल युगामध्ये जागतिक कला दिन याच्या औचित साधून हे प्रदर्शन 15 एप्रिल 2026 दिवशी प्रदर्शित होईल. चित्रकार ऋत्विज चव्हाण यांचे वैशिष्ट्य म्हणजे यांना कुठल्याही प्रकारचे चित्राबद्दल शिक्षण झालेले नाही.





तरीसुद्धा एका छंदातून त्यांनी व्यवसाइक चित्रकारितेमध्ये आंतरराष्ट्रीय पातळी गाठली आहे. ही चित्रे डिजिटल माध्यमातून पूर्ण जगामध्ये पाहता येतील. याचा नक्कीच फायदा चित्रकलेच्या गुणांना वाव मिळण्यामध्ये होईल असे चव्हाण म्हणाले. ही चित्रे ॲक्रेलिक माध्यमांमध्ये बनवलेली आहेत. आणि वैशिष्ट्यपूर्णरित्या ती कॅनव्हास वर मांडली आहेत. याचा सर्वांनी लाभ घ्यावा आणि सर्वांमध्ये शेअर करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : ऋत्विज चव्हाण**
**मो :** 8380800083.
**फेसबुक :** Rutvij Chavan
**इंस्टाग्राम :** rutvijchavan.
**युट्यूब :** Rutvij Chavan.

# परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी १ मे पासून मराठी भाषा आवश्यक – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** येत्या १ मे, महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे आवश्यक करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या 59 प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे, हा



नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे असल्याचेही ते म्हाणाले.

म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता येणे व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

# राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ

## मुंबईतील १२ अग्निशमन अधिकारी, जवानांना राष्ट्रपती पदके प्रदान



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकभवन मुंबई येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई अग्निशमन दल, एमआयडीसी व महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील १२ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

गेल्या काही दशकांत अग्निशमन दलासमोरील आव्हाने अनेक पटींनी वाढली आहेत. नागरीकरण, उंच इमारती, भूमिगत व भुयारी मेट्रो, तसेच वाढते औद्योगिक क्षेत्र यामुळे आपत्कालीन परिस्थितीचे स्वरूप गुंतागुंतीचे झाले आहे. मोठाली गोदामे आणि डेटा सेंटर्स ही काळाची गरज झाली आहेत. त्यामुळे औद्योगिक आगींपासून ते अत्याधुनिक डेटा सेंटर्स संबंधित आगीपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांना अग्निशमन दलांना सामोरे जावे लागत आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

अग्निशमन सेवा केवळ आग विझविण्यापुरती मर्यादित राहिलेली नसून महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, औद्योगिक संपत्ती आणि सार्वजनिक ठिकाणांचे संरक्षण करणे ही देखील तिची जबाबदारी झाली आहे, असे ते म्हणाले.

अलीकडच्या काळात गॅस व रासायनिक आगी, तसेच ई-कार्स आणि इतर विद्युत उपकरणांमधील लिथियम-आयन बॅटरीमुळे आगींच्या घटना घडल्या आहेत. आग प्रतिबंध, शोध आणि कारणांचे विश्लेषण आदी क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे, असे राज्यपालांनी सांगितले. बदलत्या परिस्थितीत अग्निशमन सेवेतील अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौशल्य वर्धन, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा सातत्याने अद्ययावत करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात अग्निशमन सेवांच्या आधुनिकीकरणासाठी 15व्या वित्त आयोगांतर्गत 614 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, असे सांगून हा निधी शहरी तसेच ग्रामीण भागात प्रभावी अग्निसुरक्षा सेवा पुरविण्यास निश्चितच मदत करेल, असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्रात अग्निविज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्थेची स्थापना करणे अथवा विद्यमान संस्थांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. यामध्ये आग नियंत्रणासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शोध, पर्यावरणपूरक अग्निशामक साधनांचा विकास आणि औद्योगिक व बिगरऔद्योगिक आस्थापनांचे सर्वंकष अग्निसुरक्षा ऑडिट यांचा समावेश असावा, असे राज्यपालांनी सांगितले. याशिवाय, विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना अग्निसुरक्षा सराव, जनजागृती मोहिमा आणि आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते मुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी संतोष वारिक, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी अनिल परब, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी हरिश्चंद्र रघु शेट्टी, विभागीय अग्निशमन अधिकारी देवेंद्र पाटील, सब ऑफिसर राजाराम कुदळे, सब ऑफिसर अनंत धोत्रे, लिडींग फायरमन किशोर म्हात्रे, लिडींग फायरमन मुरलीधर आंधळे, लिडींग फायरमन मोहन तोसकर, लिडींग फायरमन मुकेश काटे, विभागीय अग्निशमन अधिकारी किशोर घाडीगावकर व वरिष्ठ प्रशिक्षक किरण हत्याळ यांना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले.

सुरुवातीला महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या जॅकेटला अग्निशमन ध्वजाचे स्टॅम्प तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले.

संचालक संतोष वारिक यांनी प्रास्ताविक केले तर मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र आंबुलगेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दल, औद्योगिक आस्थापना तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी व पुरस्कारप्राप्त अधिकाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

मुंबई डॉकयार्ड येथे सन 1944 साली झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी व जवानांच्या स्मरणार्थ 14 एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस पाळला जातो तसेच या दिवसापासून अग्निशमन सप्ताह पाळल्या जातो.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त माकपची मानवंदना रॅली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्या वतीने १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य मानवंदना रॅली मोठ्या उत्साहात आणि जोशात काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात दत्तनगर येथील लालबावटा कार्यालयात डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली.

यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी लाल रंगाचे शर्ट परिधान करून लाल झेंडे, निळे झेंडे आणि तिरंगा ध्वज हातात घेत उत्साहपूर्ण वातावरणात रॅली काढली. ही रॅली दत्तनगर लालबावटा कार्यालयातून तानाबाना चौक, विववो प्रोसेस, रंगभवन मार्ग, हरीभाई देवकरण प्रशाला मार्गे डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे पोहोचली. तेथे रॅलीचा समारोप करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी 'मनुस्मृती मुर्दाबाद', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो', 'लोकशाहीचा विजय असो', 'संविधान की रक्षा कौन करेगा – हम करेंगे', –आरएसएस हो बरबाद', –लोकशाही जिंदाबाद', 'संविधान जिंदाबाद' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

दरम्यान, पक्षाच्या वतीने –भव्य लाल सैनिक तरुणांची मानवंदना रॅली' देखील उत्साहात पार पडली. या रॅलीची सुरुवात पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

यावेळी पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. एम. एच. शेख, नसीमा शेख, शेवंता देशमुख (सातखेड), ॲड. अनिल वासम, शकुंतला पाणीभाते, अशोक बल्ला, दीपक निकंबे, अखिल शेख, दाऊद शेख, नरेश दुगाणे, विक्रम कलबुर्गी, विल्यम ससाणे, बापू साबळे, बाबू कोकणे, मल्लेशम कारमपुरी, वीरेंद्र पद्मा, बाळकृष्ण मल्याळ, विजय हारसुरे, रफिक काझी हसन शेख, शहाबुद्दीन शेख, अमित मंचले, बालाजी तुम्मा, आसिफ पठाण आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

या भव्य रॅलीमुळे संपूर्ण परिसर लाल सलामच्या घोषणांनी दणाणून गेला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

# शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या : रोहन सुरवसे-पाटील



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** मार्च अखेर आणि एप्रिल २०२६ च्या पहिल्या आठवड्यात राज्यभर झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे महाराष्ट्रातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा फटका राज्यातील तब्बल २९ जिल्ह्यांना बसला असून सुमारे २ लाख ४ हजार ८३५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. अंदाजे ५ लाख १२ हजार एकर शेतीवर परिणाम झाला असून जवळपास ४ लाख शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी निवेदन सादर करून पंचनामे तातडीने पूर्ण करावेत आणि मदत वितरणाची प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणी केली आहे.

> 'या आपत्तीत काढणीस आलेल्या गहू, मका, हरभरा आणि ज्वारी या रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यासोबतच आंबा, द्राक्षे, केळी, संत्रा, डाळिंब, टरबूज आणि उन्हाळी कांदा या बागायती पिकांनाही मोठा फटका बसला आहे. विशेषतः नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अहमदनगर आणि धुळे जिल्ह्यांमध्ये नुकसानीची तीव्रता अधिक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देणे आवश्यक आहे.'
>
> **– रोहन सुरवसे पाटील,** नेते, राष्ट्रवादी काँग्रेस, पुणे.

तसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट आणि त्वरीत मदत जमा करण्यावर भर देण्यात आला आहे.

दरम्यान, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून पंचनामे अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली. बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे ही त्यांनी स्पष्ट केले.

या अवकाळी पावसामुळे काढणीस आलेल्या गहू, मका, हरभरा आणि ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय आंबा, द्राक्षे, केळी, संत्रा, डाळिंब, टरबूज आणि उन्हाळी कांदा या बागायती पिकांनाही मोठा फटका बसला आहे. विशेषतः नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अहमदनगर आणि धुळे या जिल्ह्यांमध्ये नुकसानीची तीव्रता अधिक असल्याचे समोर आले आहे.

# अनुजा बावळे मृत्यू प्रकरणी न्यायासाठी लढा तीव्र

## उदयनराजे भोसले यांची भेट, कारवाईची मागणी



**सातारा (कटूसत्य वृत्त):-** अवघ्या २२ वर्षीय अनुजा बावळे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, संबंधित डॉक्टर व रुग्णालय प्रशासनाविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी आता तीव्र होत आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते वैभव गंगणे यांनी साताऱ्यात जाऊन खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेत सविस्तर निवेदन सादर केले.

मिळालेल्या माहितीनुसार, अनुजा बावळे हिला उपचारासाठी संबंधित रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान डॉ. माधुरी दबडे व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तिचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. योग्य वेळी उपचार न मिळणे, आवश्यक वैद्यकीय काळजी न घेणे तसेच परिस्थितीची वेळेवर माहिती न देणे, या बाबींमुळेच अनुजाचा मृत्यू झाला असल्याचा दावा कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे.

या घटनेनंतर अनुजाच्या कुटुंबीयांनी तात्काळ न्याय मिळावा यासाठी पोलिस प्रशासनाकडे धाव घेतली. त्यांनी पोलिस आयुक्तांची भेट घेऊन संपूर्ण घटनेची माहिती दिली. पोलिस आयुक्तांनी या प्रकरणाची दखल घेत संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, या आदेशानंतरही तब्बल आठवडा उलटून गेला तरी अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची दखल राज्य पातळीवर घ्यावी यासाठी वैभव गंगणे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना ई-मेलद्वारे सविस्तर लेखी निवेदन पाठवले आहे. या निवेदनात संबंधित डॉक्टर व रुग्णालय कर्मचाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**तसेच, साताऱ्यात झालेल्या भेटीत खासदार उदाहरण**

यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती देण्यात आली. यावेळी गंगणे यांनी अनुजाच्या कुटुंबीयांची व्यथा मांडत न्यायासाठी तात्काळ हस्तक्षेप करण्याची विनंती केली. या मागणीची गंभीर दखल घेत खासदार उदयनराजे भोसले यांनी ह्रअनुजाला निश्चितच न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहूह्र असे आश्वासन दिले. तसेच संबंधित प्रशासनाशी संपर्क साधून योग्य ती कारवाई घडवून आणण्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, रुग्णांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. निष्काळजीपणामुळे एखाद्या निष्पाप तरुणीचा जीव गमवावा लागणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याने दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटना, नागरिक तसेच नातेवाईकांकडून केली जात आहे.

अनुजा बावळे हिला न्याय मिळवून देण्यासाठी आता आंदोलनाचा इशाराही देण्यात येत असून, लवकरात लवकर गुन्हा दाखल करून दोषींना अटक करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. प्रशासन यापुढे काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती सोलापूर जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांनी साजरी करणेत आली. विविध भिमगीतांनी सभागृह दणाणून गेले.

जिल्हा परिषदेचे आवारातील संविधान कोनशिलेस जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर यांचे हस्ते पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मराठी सेवा संघाचे वतीने पक्षांसाठी सुरू केलेले पाण्याचे व्यवस्थेचा शुभारंभ मान्यवरांचे हस्ते करणेत आला.

यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रारंभी दिप प्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करणेत आले. भिम शाहिर संदिप शिंदे प्रबोधन मंच सोलापूर, सादरकर्ते प्रा. जिवन संदिप शिदे व संच यांनी भीम गीत गायन केले. समाज कल्याण विभाग व कास्ट्राईब संघटनेचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते.

प्रारंभी समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी संविधान उद्देशिका वाचन केले.

**भारताची राजधानी हैद्राबाद येथे करणेची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पना – विमल धायरकर**

भारताची राजधानी हैद्राबाद येथे करा. मध्यवर्ती ठिकाण असल्याचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविले होते. बाबासाहेब यांते जीवन चरित्रावर निलेश विमल धायरकर पुणे यांनी राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब यांनी भाषावाद व प्रांत वाद होणार नाही याची काळजी घेतली. भारतीय रुपयाचे अवमुल्यन होत असल्याचे ग्रंथातून त्यांनी स्पष्ट केले असल्याचे व्याख्याते धायरकर यांनी सांगितले.

या कार्यक्रमात समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभार्थ्यांचा व आंतरजातीय विवाह केलेले जोडप्यांचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष पवार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार , समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, उप मुख्य कार्यकारी सुर्यकांत भुजबळ, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरूण क्षिरसागर, लिपिक वर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, अधिक्षक गिरीष जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, रणजित घोडके, अभिमन्यु कांबळे, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांचेसह सर्व खातेप्रमुख हे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी प्रास्ताविक केले.

**सर्व क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान– सिईओ कुलदीप जंगम**

देशाच्या सर्व क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान दिले असे मत जिल्हा परिषदेचे सिईओ कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले. त्यांना एका समाजापुरते सीमित केले असल्याची खंत व्यक्त करून परदेशात महिलांना मतदानाचा अधिकारी देणे साठी १५० वर्षे लागली परंतु भारतात स्वातंत्र्य मिळाले नंतर लगेच मतदानाचा महिलांना अधिकार मिळाला. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान असल्याचे सिईओ कुलदीप जंगम सांगितले. विकसीत भारतासाठी काम करूया असे आवाहन सिईओ जंगम यांनी केले.

**शिक्षण वाघीणीचे दुध – अध्यक्ष वैद्य**

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. ती पिल्यानंतर गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते. असेही जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील सर्व घटकांपर्यंत जिल्हा परिषेदेचे कार्य सुरू आहे. कोणीही वंचित राहणार नाही याची काळजी जिल्हा परिषद घेत असल्याचे अध्यक्ष वैद्य यांनी सांगितले.

या प्रसंगी समाज कल्याण विभागाचे सभापती संस्कृती सातपुते बोलताना म्हणाल्या, देशाला स्वातंत्र्य बरोबर इतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बील लिहिले. त्यांची अंमलबजावणी होत नाही म्हणून संघर्ष केला. जगात रक्तरंजित क्रांती झाल्या परंतू भारतात अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळविणे साठी प्रयत्न केले. महिलांना मतदानाचा अधिकार मिळणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वपुर्ण योगदान आहे. मराठी व इंग्रजी भाषणातून सभापती सातपुते यांनी बाबासाहेब यांचे कायार्ची माहिती दिली. समाज कल्याण विभाग जिल्ह्यात विविध उपक्रम राबवित असल्याचे सांगितले.

या प्रसंगी महिला व बाल कल्याण विभागाचे सभापती ॲड. अमृता वाघे यांनी मनोगत व्यक्त केले. यासाठी अधिक्षक सचिन सोनकांबळे, विस्तार अधिकारी स्वाती गायकवाड, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांनी प्रयत्न केले . या प्रसंगी कास्ट्राईब संघटनेचे वतीने उमाकांत राजगुरू, योगेश कटकधोंड, शंकर चलवादी, धन्यकुनार राठोड यांना मान्यवरांचे हस्ते मिठाई वाटप केली.

प्रारंभी कास्ट्राईब संघटनेच्या कार्यालयात मान्यवरांनी भेट देऊन जयंती निमित्त कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन विस्तार अधिकारी सुहास गुरव यांनी केले तर कल्याण श्रावस्ती यांनी आभार मानले.

**कास्ट्राईब संघटनेचे वतीने मिठाईचे वाटप**

जयंती निमित्त कास्ट्राईब संघटनेचे वतीने उपस्थित सर्वांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हस्ते मिठाईचे वाटप करणेत आले. कास्ट्राईब संघटनेचे जिल्हा अरूण क्षिरसागर यांनी ही परंपरा अनेक वर्षा पासून कायम ठेवली आहे. संघटनेचे उमाकांत राजगुरू, योगेश कटकधोंड, शंकर चलवादी, धन्यकुनार राठोड यांनी मिठाई वाटप करणे साठी परिश्रम घेतले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भिमगितांनी दणाणले सभागृह**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात भिम शाहिर संदिप शिंदे प्रबोधन मंच सोलापूर, सादरकर्ते प्रा. जिवन संदिप शिदे व संच यांनी भीम गीत गायन केले. समाज कल्याण विभाग व कास्ट्राईब संघटनेचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. बाबासाहेब यांचे जीवनावरील कार्याची भिमगिते या वेळी सादर करून सभागृह दणाणून सोडले.

# महात्मा फुले जयंतीनिमित्त सोलापूर महापालिकेकडून अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पूज्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सुपर मार्केट येथील त्यांच्या पुतळ्यास तसेच कॉन्सील हॉल येथील महापौर कार्यालयात असलेल्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते हा अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, नगरसेविका कल्पना कदम, नगरसेविका सारिका खजुरगी, नगरसेवक प्रशांत पल्ली, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगरसेवक विजय चिप्पा, महेश देवकर, संतोष कदम, तसेच सहायक आयुक्त (समाज कल्याण) सुलोचना सोनावणे आणि कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या समाजप्रबोधनाच्या कायार्चा गौरव करण्यात आला.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–

8083608083
9922646566
8698732109

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

## सुडोकु – 226

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | | | | | | |
| | 3 | 1 | | | 2 | 4 | | |
| | 4 | | | | | | 5 | 2 |
| 9 | 6 | | 4 | 1 | | 8 | 7 | |
| 1 | | | 7 | | 3 | 9 | 2 | |
| | | 4 | 9 | | 8 | 1 | | |
| 4 | | 6 | 1 | | 7 | 2 | 3 | |
| 7 | 5 | 3 | | | | | 9 | 1 |
| | 1 | | | | 6 | 5 | | |

# पोलीस भरतीत यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयातील माजी विद्यार्थी निकिता सोडमिसे, मिथाली सोडमिसे, महादेव लांडगे, योगेश माळी, अभिजित होळ या पाच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थ्यां यांची पुणे पोलीस म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या अध्यक्षा पदमजादेवी मोहिते पाटील, संचालक डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, उर्वशीराजे मोहिते पाटील, प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम, प्रा.जगदीशचंद्र मुळीक, प्रा.उत्तम सावंत, प्रा.दत्तात्रय शहाणे, प्रा. हनुमंत वाघमोडे, डॉ. संभाजी बनसोडे, प्रा.पै.नारायण माने व महाविद्यालयाचा सर्व स्टाफ यांच्या वतीने पोलीस भरतीत यश मिळवलेल्या वरील विद्यार्थ्यांचा फेटा शाल हार घालून त्यांचा सन्मान करण्यात आला. अशाप्रकारे होणारा गौरव विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी मोलाची भूमिका बजावत असल्याचे मत यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब निकम यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या पुढील यशस्वी कायार्सांठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त फोटो प्रकाशन समारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना,सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोच्या प्रकाशनाचा कार्यक्रम संपन्न झाला.सोलापूरचे प्रथम नागरिक महापौर विनायक कोंड्याल यांच्या शुभहस्ते सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास संयोजक तथा मातंग समाजाचे नेते सुरेश पाटोळे, माझी महापौर श्रीकांचना यमन,नगरसेविका श्रीदेवी फुलारे नगरसेवक भारत बडूरवाले, नगरसेवक बिजू प्रधाने, नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, लष्कर मातंग समाज अध्यक्ष भीमराव दाजी गायकवाड, क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळ अध्यक्ष अभिषेक हाटकर, लष्कर विभाग मध्यवर्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष रमेश कसबे,युवा नेते गोविंद कांबळे, युवा नेते प्रवीण वाडे,लेखक किशोर जाधव, अभिजीत भंडारे,रोहित खिलारे आदींची प्रमुख उपस्थित होती.

# टेंभुर्णीत पोलिसांचा रूट मार्च; दंगा काबू योजनेची रंगीत तालीम



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** आगामी सण, उत्सव व महापुरुषांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या वतीने रविवारी शहरात रूट मार्च काढण्यात आला. याचबरोबर दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेऊन पोलिसांनी आपली तयारी दर्शविली.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परी. सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत टेंभुर्णी शहरातील मुख्य रस्ते व मध्यवर्ती भागातून पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांच्या उपस्थितीत शिस्तबद्ध रूट मार्च पार पडला. सरकारी वाहनांच्या ताफ्यासह झालेल्या या मार्चमुळे शहरात पोलिसांची ठोस उपस्थिती जाणवली.

यानंतर पोलीस ठाण्याच्या आवारात दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. यामध्ये लाठी, हेल्मेट, ढाल, गॅस गन, रायफल आदी साहित्यांसह पोलिसांनी प्रात्यक्षिक सादर करून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

त्यानंतर मोडनिंब शहरातही मुख्य रस्ते व मध्यवर्ती भागातून रूट मार्च काढण्यात आला. या उपक्रमाद्वारे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करत, कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला.

या रूट मार्च व रंगीत तालीमीत पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच माढा पथकाचे होमगार्ड सहभागी झाले होते.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानकडून मटके वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** कडक उन्हाळ्यात नागरिकांना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या सामाजिक जाणीवेतून श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने मटके (डेरा) वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

मुरारजी पेठ येथील विजयप्रकट हनुमान मंदिर, उमा नगरी येथे आयोजित या कार्यक्रमात वस्तीतील तसेच पत्र्याच्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना मटके वाटप करण्यात आले. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर थंड पाणी सहज उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. या प्रसंगीप्रमुख पाहुणे म्हणून डिसीएम कार्यालयचे अधीक्षक साधना शिंदे, बालाजी मंदिरचे ट्रस्टी सुहास लाहोटी, समाजसेवक प्रभू पडसलगी तसेच संस्थेचे अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रतिष्ठानच्या वतीने हा नववा सामाजिक उपक्रम असून, दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एकूण दहा विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती महेश कासट यांनी दिली.

प्रतिष्ठानच्या वतीने दहाव्या वर्धापन दिनानिमित्त दहा उपक्रम घेण्यात येणार आहे. त्यापैकी याआधी विद्यार्थी दत्तक योजना, अन्नधान्य व सॅनिटरी पॅड वितरण, स्टील पाणी टाकी स्थापना, दिवाळी फराळ वाटप, वेशभूषा व चित्रकला स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांना चादर वाटप अशा विविध उपक्रमांद्वारे प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षता कासट यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेश ढेंगळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजीत व्हानकळस, प्रकाश आंळगे, निशांत वाघमारे, गणेश माने, शिला तापडिया, रंजना ढेंगळे आदींनी परिश्रम घेतले.

# महापालिकेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास तसेच मिलिंद नगर येथील अस्थिविहार येथे महापौर विनायक कोड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर महापालिका कॉन्सिल हॉल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस आज महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, माजी महापौर श्रीकांचना यमन, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, नगरसेवक जंगम, नगरसेवक बिजू प्रधाने, नगरसेवक भरत सिंग बेडर वाले नगरसेवक सतीश शिरशीला नगरसेवक ज्ञानेश्वर मेहकर नगरसेविका श्रीदेवी फुलारे नगरसेविका वंदना गायकवाड नगरसेविका संगीता जाधव नगरसेविका कल्पना कल्पना कदम तसेच यांच्या सह नगरसेवक, नगरसेविका आदी मान्यवर उपस्थिती होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्रवादीकडून अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोलापूर शहरच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

समाजातील वंचित, उपेक्षित घटकांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्यात स्वाभिमानाची जाणीव निर्माण करणारे तसेच मानवतावादी विचारांची पायाभरणी करणारे डॉ. आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सर्वांना समान न्यायाचा संदेश दिला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान देशासाठी अत्यंत मोलाचे असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

या अभिवादन कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष संतोष पवार, व्ही. जे.एन.टी. अध्यक्ष रुपेश भोसले, प्रज्ञासागर गायकवाड, शामराव गांगर्डे, ओबीसी सेल अध्यक्ष अनिल छत्रबंद, कार्याध्यक्ष अय्युब शेख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाज कल्याण विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य वक्तृत्व स्पर्धा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्फे 'सामाजिक समता सप्ताह'चे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे औचित्य साधून मंगळवार, १४ एप्रिल २०२६ रोजी इयत्ता ७ वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद सोलापूरच्या समाज कल्याण सभापती सौ. संस्कृती राम सातपुते यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा साकार होत असून, विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांचे विचार रुजवणे आणि सामाजिक जाणीव जागृत करणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

विद्यार्थ्यांना खालीलपैकी एका विषयावर आपले विचार मांडता येतील:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांसाठी केलेले कार्य: (उदा. मतदानाचा हक्क, वारसा हक्क, प्रसूती रजेचा हक्क इ.)

चवदार तळे, महाड – शताब्दी वर्ष विशेष.

मानवी हक्कांचे महत्त्व.

संत गाडगे महाराज यांच्या कार्याचा गौरव: (१५० वी जयंतीनिमित्त).

सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले वक्तृत्व कौशल्य सिद्ध करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. तरी, जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# सूरसाम्राज्ञी आशा भोसले यांना वाहिली श्रद्धांजली



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** भारतीय संगीतविश्वातील अजरामर आवाज, जागतिक कीर्तीच्या, विश्वविक्रमी गायिका पार्श्वगायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्रभूषण, स्वामीरत्न, सूरसाम्राज्ञी आशा भोसले यांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि अन्नछत्र परिवार, भोसले कुटुंबिय व अमोलराजे भोसले मित्रपरिवार, अमोलराजे लेझीम संघ यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

दरम्यान श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या परिसरातील असलेल्या लता दीदी मंगेशकर यांचा रथ–आशीर्वाद या ठिकाणी न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते भारतीय संगीतविश्वातील अजरामर आवाज, जागतिक कीर्तीच्या, विश्वविक्रमी गायिका पार्श्वगायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्रभूषण, स्वामीरत्न, सूरसाम्राज्ञी आशा भोसले पुष्पहार घालून प्रतिमा पूजन करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

सूरसाम्राज्ञी आशा भोसले यांना दि. १५ जुलै २०१९ रोजी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली स्वामीरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

या प्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, सौरभ मोरे, मनोज निकम, निखील पाटील, प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे, संजय गोंडाळ, चेतन जाधव, बाळासाहेब पोळ, शहाजी यादव, सनी सोनटक्के, स्वामिनाथ बाबर, विशाल कलबुर्गी, केदार तोडकर, सुमित घाडगे, दत्ता माने, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, रमेश हेगडे, राजू पवार, शरद भोसले, सतीश महिंद्रकर, शुभम सावंत, विनायक भोसले, समर्थ घाडगे, प्रसाद मोरे, रोहित कदम, सुभाष पेटकर, ॲड. फहीम पिरजादे, धनंजय माने, किरण साठे, राहुल इंडे, ज्ञानेश्वर भोसले, मल्लिकार्जुन गवळी, मल्लिनाथ कोगनुरे, शिवकुमार स्वामी, महेश पाटील, पिंटू हळ्ळूरे, कुमार सलबत्ते, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण, महादेव वाले, इरय्या स्वामी, हरी राऊत, मारुती बोरकर यांच्या सह महिला सेवेकरी, पदाधिकारी, सेवेकरी, कर्मचारी, अन्नछत्र परिवार, भोसले कुटुंबियांच्या व अमोलराजे भोसले मित्रपरिवार, अमोलराजे लेझीम संघ व स्वामी भक्त यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# ४२९ शाळांची पटपडताळणी; ९६.५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्हा परिषद सोलापूरच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आज जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये शाळांची प्रत्यक्ष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेच्या पहिल्या दिवसात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा आढावा घेण्यात आला असता, एकूण उपस्थिती ९६.५० टक्के इतकी समाधानकारक असल्याचे समोर आले.

पट पडताळणी मोहिमेच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील एकूण ४२९ शाळांची तपासणी करण्यात आली. या शाळांमध्ये एकूण ७३ हजार १४१ पटसंख्या नोंदविण्यात आली असून, त्यापैकी ७० हजार ५८० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर २ हजार ५६१ विद्यार्थी अनुपस्थित असल्याचे आढळले. तालुकानिहाय पाहता माढा तालुक्यात सर्वाधिक ९९.४४ टक्के उपस्थिती नोंदली गेली असून, मोहोळ तालुकाही ९९.५३ टक्क्यांसह आघाडीवर राहिला. बार्शी, माळशिरस, मंगळवेढा या तालुक्यांनीही ९८ टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती नोंदवत चांगली कामगिरी केली. करमाळा, सांगोला आणि पंढरपूर या तालुक्यांमध्येही उपस्थितीचा टक्का ९७ च्या पुढे राहिला.

याउलट अक्कलकोट (९५.१७ टक्के) आणि उत्तर सोलापूर (९६.८४ टक्के) येथे तुलनेने कमी उपस्थिती दिसून आली. विशेषतः मनपा सोलापूर क्षेत्रात केवळ ९२.४७ टक्के उपस्थिती नोंदली गेली असून, हे प्रमाण जिल्ह्यात सर्वात कमी आहे. त्यामुळे शहरी भागात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

या पटपडताळणी मोहिमेमुळे शाळांमधील वास्तविक उपस्थितीचे चित्र स्पष्ट झाले आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे दिसून येत असताना, काही भागात अजूनही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. आगामी काळात शंभर टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिक्षक, पालक आणि प्रशासन यांच्यात अधिक समन्वय वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

एकूण : शाळा – ४२९, पटसंख्या – ७३१४१, उपस्थित – ७०५८०, अनुपस्थित – २५६१, टक्केवारी – ९६.

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार



माढा (कटूसत्य वृत्त):– थोर महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे महान कार्य व विचार युवा पिढीने आचरणात आणणे आवश्यक आहे.युवकांनी दर्जेदार पुस्तके,साहित्य व वृत्तपत्रे वाचून वाचन संस्कृती जोपासली पाहिजे.वाईट व्यसनापासून दूर राहिले पाहिजे.उच्च शिक्षण देऊन मुलांमुलींना सक्षम व आत्मनिर्भर बनविले पाहिजे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे वाचन कौशल्य व स्मरणशक्ती सुदृढ ठेवण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.प्रत्येकाने जीवनातील यशस्वीतेसाठी पोटाची भूक भागवताना ज्ञानाचीही भूक वाढवावी असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते रोहित भडकवाड यांनी केले.

ते विठ्ठलवाडी ता.माढा येथे श्री विठ्ठल सार्वजनिक वाचनालय व महात्मा फुले प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मंगळवारी 14 एप्रिल बोलत होते.

प्रास्ताविक आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले.

सुरुवातीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर थोर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन वक्ते रोहित भडकवाड,चेअरमन अनिलकुमार अनभुले व अध्यक्ष रामचंद्र भांगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्रीय नवोदय विद्यालयासाठी व शासकीय सेवेत निवड झालेल्या,टीईटी व सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षक व भावी शिक्षकांचा व नूतन विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचा संयोजकांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी आरोग्य विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.मोहन शेगर,सेवानिवृत्त उपशाखा प्रबंधक मोहन कदम, बाळू गुंड,चेअरमन अनिलकुमार अनभुले, तंटामुक्ती अध्यक्ष अरुण मोरे, उपलेखापरीक्षक सुहास शिंगाडे, उपसरपंच हनुमंत जाधव, वाचनालयाचे अध्यक्ष रामचंद्र भांगे, सचिव नेताजी उबाळे, हनुमंत पाटील, भिमराव शिंगाडे, अर्जून माने, दिपक गव्हाणे, सुधीर गुंड, माया माने, कलावती नागटिळक, धनश्री नागटिळक, ऋषाली नागटिळक,उषा गाडे, अंकुश डूचाळ, गणेश नागटिळक, धनाजी सस्ते, सुशेन भांगे, किशोर गुंड, पोलीस पाटील बालाजी शेगर, सतीश गुंड, भिवाजी जाधव,समाधान कोकाटे,दिनेश गुंड, सुशेन मुळे, गोरख शेगर, ग्रंथपाल अमोल जाधव, रवींद्र शेंडगे, अविनाश माने, भिमराव नागटिळक, नवनाथ शेरखाने, हनुमंत नागटिळक, कैलास गाडे, बबलू नागटिळक, अंकुश नागटिळक, बालाजी गाडे यांच्यासह ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सब पोस्ट मास्तर अंकुश डूचाळ यांनी केले. आभार गणेश नागटिळक यांनी मानले.

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये सामाजिक समतेचा संदेश; फुले–आंबेडकर जयंती साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे सामाजिक न्यायाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी तसेच महान समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी स्वतंत्रपणे विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यावर आधारित मनोगते व विचार मांडले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव व सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर माननीय संजय नवले यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात महात्मा फुले यांच्या शिक्षणप्रेमी व स्त्रीशिक्षणातील योगदानाचा गौरव करत विद्यार्थ्यांना समता, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व पटवून दिले.

त्यानंतर १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पण करून झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकायार्ला अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय नवले यांनी आपल्या मनोगतात संविधान, समानता आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले.

दोन्ही कार्यक्रम सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज आणि एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात साजरे झाले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाच्या सवयीवर विशेष भर देण्याचे आवाहन केले. आजच्या डिजिटल युगात केवळ रिल्स आणि क्षणिक मनोरंजनाकडे आकर्षित न होता, ज्ञानवृद्धीसाठी वाचन हीच खरी गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. महापुरुषांचे विचार केवळ ऐकण्यात किंवा साजरे करण्यात अर्थ नाही, तर ते आचरणात आणण्याचा प्रत्येकाने निश्चय केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच महापुरुष हे कोणत्याही एका समाजाचे किंवा धमार्चे नसून ते संपूर्ण देशाचे असतात, हा संदेश त्यांनी ठळकपणे मांडला.

यावेळी विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. शौर्य नवले, प्रसन्न रत्नाकर, यशोदीप शिंदे आदी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून बाबासाहेबांविषयीचा आदर आणि प्रेरणा स्पष्टपणे जाणवत होती. कार्यक्रमामुळे उपस्थित सर्वांना बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.

यावेळेस सिंहगडच्या सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. एस एच पवार, पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, ग्रंथपाल जी. एच. घोगले, विद्यानंद बाबर, क्लर्क नवनाथ भडंगे, जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे, शिपाई सचिन भानवसे आदींची उपस्थिती होती.